# आयुष्यमान
सातारा

*संपादक-अतुल सुभाष होनकळसे

*सातारा *वर्ष:१४ वे *अंक:८ *सोमवार,दि.२७ मार्च ते दि.०२ एप्रिल २०२३ *RNI No- MAHMAR/2009/32171 *किंमत २ रू. *पाने ४


# डॉ.अतुलबाबा भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

## रेठरे बुद्रुक येथे अभिष्टचिंतन सोहळा; शुभेच्छा स्वरूपात शालोपयोगी साहित्य देण्याचे आवाहन

**कराड/प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टीचे सातारा लोकसभा प्रभारी तथा कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन डॉ. अतुलबाबा भोसले यांचा वाढदिवस मंगळवार दि. २८ मार्च रोजी साजरा होत आहे. यानिमित्त २७ मार्च ते ९ एप्रिलपर्यंत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, मंगळवारी (ता.२८) डॉ.अतुलबाबा भोसले हे सकाळी ८ पासून रेठरे बुद्रुक इंजिन पाणंद येथील निवासस्थानी शुभेच्छा स्वीकारण्यासाठी उपस्थित राहणार असून; नागरिकांनी हार, तुरे, बुके न आणता शालेपयोगी साहित्य शुभेच्छा स्वरूपात आणावे, असे आवाहन वाढदिवस संयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

डॉ.अतुलबाबा भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त कराड दक्षिण मतदारसंघात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. २८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता रिमांड होम येथे भोजन वाटप, सकाळी ९.३० वाजता कराड उपजिल्हा रुग्णालय आणि कोळे येथील जिजाऊ अनाथाश्रमात फळे व खाऊ वाटप, नेर्ले येथे वृद्धाश्रमात मध्यान्ह व सायंकाळ भोजन वाटप, तसेच नांदगाव येथे सकाळी १०.३० वाजता सर्वरोग निदान व दंत चिकित्सा शिबीर आणि रेठरे बुद्रुक येथे सायंकाळी ७ वाजता गणेश शिंदे यांचे 'जीवन सुंदर आहे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

बुधवारी २९ मार्च रोजी गोंदी येथे सकाळी १० वाजता ठेव पावती वितरण समारंभ व अल्पदरात कृषी साहित्य वाटप, सायंकाळी ५ वाजता मलकापूर येथे भव्य बैलगाडी शर्यती, सायंकाळी ६ वाजता नांदगाव येथे स्नेहमेळावा, रेठरे बुद्रुक येथे सायंकाळी ७ वाजता 'खेळ पैठणीचा', तसेच चचेगाव येथे सायंकाळी ८ रेकॉर्ड डान्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

गुरुवारी ३० मार्च रोजी कार्वे येथे सकाळी १० वाजता भव्य रक्तदान शिबिर, रेठरे बुद्रुक येथे सकाळी १० वाजता प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धा, कोडोली येथे सकाळी ११ वाजता महिला सक्षमीकरण व बचत गट मार्गदर्शन कार्यक्रम, कराड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सायंकाळी ७ वाजता जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा, ३१ मार्च रोजी कराड येथे वेणूताई चव्हाण सभागृहात आयुष्यमान भारत स्मार्ट कार्ड वाटप व आशा सेविका यांचा सन्मान, मलकापूर येथे सायंकाळी ४ वाजता सिने अभिनेत्री डॉ. भाग्यश्री शिंदे यांचा मनोरंजनात्मक कार्यक्रम, तसेच ओंड येथे दुपारी २ वाजता भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवारी १ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता कोयना वसाहत येथे नेत्र चिकित्सा व मोतीबिंदू तपासणी शिबीर , वारुंजी येथे सायंकाळी ५ वाजता भव्य बैलगाडी शर्यती व कराड येथील प्रीतिसंगम घाटावर सायंकाळी ६ वाजता 'होम मिनिस्टर' कार्यक्रम, रविवारी २ एप्रिल रोजी कराड शिवाजी विद्यालय आवारात सकाळी ६ वाजता भव्य मॅरेथॉन स्पर्धा, सकाळी ११ वाजता आटके टप्पा येथील विराज मल्टिपर्पज हॉलमध्ये कृष्णा बँकेचे खातेदार, उद्योजक व व्यावसायिकांचा मार्गदर्शन मेळावा आणि सायंकाळी ६.३० वाजता कराड येथील प्रीतिसंगम घाटावर 'भूपाळी ते भैरवी' या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता कराड येथील प्रीतिसंगम घाटावर ग. दि. माडगूळकर यांचे 'गीतरामायण', ५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता घोणशी येथे भव्य बैलगाडी शर्यती, ६ एप्रिल रोजी रेठरे खुर्द येथे सायंकाळी ७ वाजता क्रिकेट स्पर्धा, ८ एप्रिलला सैदापुर येथे सकाळी १० वाजता शालेय साहित्य व फळे वाटप, ९ एप्रिल रोजी सैदापुर येथील समर्थ मल्टिपर्पज हॉलमध्ये दुपारी २ वाजता 'खेळ पैठणीचा' व सायंकाळी ८ वाजता महिलांचा फॅशन शो असे विविधांगी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, असे संयोजन समितीच्यावतीने कळविण्यात आले आहे.







संपादकीय

# घडते आहे ते भलतेच

गुढी पाडव्याच्या सुटीनंतर संसदेचे कामकाज सुरू होईल. पण ते सुरळीत होण्याची शाश्वती नाही. गेला आठवडा जवळपास वाया गेला आहे. आताही सरकार आणि काँग्रेस यांच्यात काही ना काही सुसंवाद झाल्याशिवाय कामकाज सुरू होण्याची शक्यता नाही. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील औपचारिक संवादालाही ओहोटी लागलेली असताना अनौपचारिक संवाद साधून यातून मार्ग काढण्याची खटपट तरी कोण करणार, हा प्रश्नच आहे. यावेळी, संसदेच्या अधिवेशनात सत्ताधाऱ्यांनीच कामकाज होऊ न देण्याचा अभूतपूर्व प्रकार घडला. राहुल गांधी हे परदेशात असताना त्यांनी काही मुलाखती दिल्या. लंडनमध्ये त्यांनी 'भारतात लोकशाही धोक्यात असून तिच्यावर हल्ले होत आहेत,' अशा स्वरुपाचे विधान केले. हे विधान अर्थातच सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि मोदी सरकार यांच्या विरोधात होते. या विधानाबद्दल राहुल गांधी यांनी माफी मागावी, अशी मागणी भाजप आणि मित्रपक्षांनी लावून धरली आणि या एका मागणीसाठी संसदेचे कामकाज होऊ दिले नाही. राहुल गांधी यांनी 'भारताची लोकशाही ही साऱ्या जगाची आहे,' असेही विधान केले. या विधानाचा उत्तरार्ध 'ही लोकशाही वाचविण्यासाठी सर्वांनी मदत करण्याची गरज आहे,' असा निघतो. राहुल गांधी यांनी परदेशात असे बोलताना संयम पाळण्याची गरज होती. त्यांनी भारताच्या संसदेत किंवा देशातील जाहीर सभा, मेळावे, पत्रकार परिषदा येथे हवी ती टीका करण्यास हरकत नाही. मात्र, परदेशी भूमीवर जाऊन आपल्याच देशात लोकशाही आहे किंवा नाही, याबद्दल शंका व्यक्त करणे, हे एका अर्थाने इतर देशांच्या हातात कोलित देण्यासारखेच आहे. राहुल गांधी यांनी भारतात आल्यानंतर आपल्या विधानाचा खुलासा देण्याचा प्रयत्न केला. एकदा त्यांनी तो खासदारांच्या समितीच्या बैठकीत केला. दुसरे म्हणजे, त्यांनी लोकसभेच्या अध्यक्षांना 'आपल्याला सभागृहाचे सदस्य या नात्याने निवेदन करू देण्याची अनुमती द्यावी,' असे पत्र पाठविले आहे. कामकाज असे बंद पडलेले असताना आता भाजपच्या काही खासदारांनी आता राहुल गांधी यांनी केवळ माफी मागून चालणार नाही, तर त्यांना संसदेतून निलंबितच करायला हवे, अशी भूमिका घेतली आहे. राहुल गांधी यांना अशा प्रकारे निलंबित करण्यात आले तर संसदेतील तसेच संसदेच्या बाहेरील भाजप आणि काँग्रेस यांचे संबंध आणखी बिघडत जातील. सत्ताधाऱ्यांनीच माफीसाठी संसदेत अशी आक्रमक भूमिका घेतली असताना काँग्रेसने अदानी प्रकरणात संयुक्त संसदीय समिती नेमा, अशी मागणी करून प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे, आता संसदेचे कामकाज होऊ न देण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक या दोघांकडेही त्यांची त्यांची स्वतंत्र कारणे आहेत. अदानी प्रकरणात संसदीय समिती नेमण्याची मागणी भाजप मान्य करण्याची सुतराम शक्यता नाही. भाजप आणि काँग्रेस यांच्यातील या संसदीय लढाईत इतर विरोधक नेमकी काय भूमिका घेतात, हे आता या आठवड्यात समजेल. या पक्ष आणि नेत्यांमध्येही दोन्ही बाजूंना चार पावले मागे येण्यासाठी आवाहन करू शकतील, असे फारसे नेते आता उरलेले नाहीत. याही पेक्षा भाजप आणि केंद्र सरकार मुद्दामच राहुल गांधी यांना विरोधकांच्या केंद्रस्थानी तर आणून ठेवत नाही ना, या शक्यतेचाही गंभीर विचार करायला हवा. येत्या सार्वत्रिक निवडणुकीत विरोधकांचे संभाव्य ऐक्य हा भाजपसाठी धोका ठरण्याची शक्यता आहेच. भाजपकडे समजा ३७ ते ४० टक्के मते असली तरी काँग्रेससहित सगळेच विरोधक एकत्र आले तर आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होऊ शकते. मात्र, काँग्रेसची देशभरातील स्थिती पाहता इतर विरोधक काँग्रेस किंवा राहुल गांधी यांच्याकडे विरोधकांचे नेतृत्व देण्यास फारसे उत्सुक नाहीत. संसदेत हा संघर्ष चालू असतानाच तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात जी चकमक उडाली, त्यावरून परिस्थितीचा अंदाज यावा. काँग्रेसची संघटनात्मक ताकदही देशभरात ओहोटीला लागली आहे. असे असताना भाजपच्या विरोधकांचा मुख्य माध्यमे आणि समाज माध्यमांमधला सगळा अवकाश राहुल गांधी यांनी व्यापून टाकणे, हे काँग्रेसेतर विरोधी पक्षांच्या हिताचे कसे काय ठरेल? त्यांना हे आवडतही नसणार. दुसरीकडे, भाजप मात्र २०१९ प्रमाणे जणू काही राहुल गांधी हेच मुख्य विरोधक आहेत, असे फसवे चित्र उभे करीत आहे. त्याचवेळी, अनेक प्रादेशिक पक्षांशी– त्यांना त्यांच्या राज्यात अभय देऊन– सर्वच विरोधकांची 'बडी आघाडी' होऊ न देण्यासाठी बोलणी चालू असतीलच. तेव्हा संसदेतला सध्याचा हा अवरोध जितका लांबेल, तितके विरोधकांचे नुकसान होत राहणार आहे. पुन्हा पंतप्रधान मोदी, पक्षाध्यक्ष नड्डा यांच्यापासून सारे नेते बाहेर काँग्रेसवर टीका करण्यास मोकळेच आहेत. काँग्रेसकडे राजकीय चातुर्य असते तर संसदेतील या कृतक, लुटुपुटूच्या संघर्षात न अडकून पडता पक्षाने मैदानातील तयारीकडे लक्ष वळविले असते. मात्र, घडते आहे ते भलतेच.

# तरूणांचे आशास्थान– डॉ.अतुल भोसले [बाबा]

**अनेक दशकाचा इतिहास लाभलेल्या भारतभूमीत इतिहास घडविणारी माणसं जन्माला आली. त्यातील काही महान व्यक्तिंचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहावा असाच घडला. असेच तडफदार आणि उदयोन्मुख नेतृत्व, युवकांचा बुलंद आवाज अतुलबाबाच्या रूपाने प.महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात घुमू लागला आहे. तमाम तरुणांचे आशास्थान, आबालवृद्धांचे आश्रयस्थान असलेले कृष्णा उद्योग समुहाचे युवा नेते, भाजपाचे सातारा लोकसभा प्रभारी व कृष्णा बँकेचे अध्यक्ष डॉ.अतुल भोसले (बाबा) यांचा आज (दि.२८) रोजी वाढदिवस साजरा होत आहे त्यानिमित्त...**



शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी असण्यासाठी त्या बिजात ते गुणधर्म ही असावे लागतात. सहकारमहर्षी जयवंतराव आप्पा, जेष्ठ विचारवंत स्व. यशवंतराव भाऊ या बंधूंनी कृष्णाकाठी गेल्या ६० वर्षापासून विकासाचं पर्व उभं केलं. त्यांनी रचलेल्या पायावर सोनेरी कळस अतुल बाबांच्या कर्तुत्वाने चमकू लागला असून कृष्णा उद्योग समुहाचा आज वटवृक्ष झाला आहे. त्याच्या अनेक संस्थांरूपी फांद्यांनी विशाल रुप धारण केले आहे. समाजाबद्दल असलेली प्रामाणिक निष्ठा, तत्त्व आणि मी समाजाचं काहीतरी देणं लागतो ही असलेली आत्मीयता ही विचारसरणीच आज खऱ्या अर्थाने अतुल बाबांसाठी कार्यकर्त्याचं मोहळ बनलं आहे. सहकार महर्षीच्या पाऊलावर पाऊल ठेवून शांत आणि संयमी नेतृत्वाने डॉ.सुरेश भोसले बाबांनी केलेली वाटचाल सामाजिक, सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या झपाट्याने वाढली आणि विखुरली आहे. आजोबा आणि वडीलांच्या विचारांचा वारसा आणि वसा डॉ. अतुल बाबांच्या मनात ठसठसून भरला आहे. कृष्णाकाठी उभ्या केलेल्या संस्थांना डॉ.अतुलबाबांनी मोठ्या उमेदीने आणि श्रद्धेने वाढविले असून माझ्या गावातल्या, भागातल्या आणि गोरगरीब कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलाला उच्चशिक्षण मिळाले पाहिजे या हेतूने सातत्याने प्रेरीत राहून डॉक्टर, इंजिनिअर होण्याचे स्वप्न कृष्णाकाठासह प.महाराष्ट्रातील जनतेच्या डोळ्यात दिसू लागले. ही किमया डॉ. अतुल बाबांच्या कर्तुत्वाने उदयास आली असे म्हटलं तर वावगं ठरु नये. अतुल बाबा हे स्वत: एक डॉक्टर असून त्यांना गोरगरीब समाजाची व्यथा आणि हालअपेष्ठांची जाणीव असल्याने प्रत्येक सर्वसामान्य लोकांच्या प्राथमिक गरजाची पुर्तता झालीच पाहिजे ही तळमळ खऱ्या अर्थाने समाजाबद्दलच्या आत्मीयतेची साक्ष आहे. प्राथमिक शिक्षणाचे बाळकडू आणि डॉक्टर इंजिनिअरचे शिक्षण कृष्णाच्या एकाच छताखाली मिळू लागल्याने संपूर्ण ग्रामीण भाग शिक्षणाचा गोडवा गाऊ लागला आहे. ही किमया करताना अपार कष्ट, त्याग आणि समाजाबद्दलची तेवढीच धडपड बाबांमध्ये नेहमीच दिसून आली आहे. यश हे एका रात्रीत मिळत नसतं त्यासाठी अनेक वर्ष दिवस-रात्र पाय झिजवावे लागतात. कर्तुत्वसंपन्न लोकांच्या कार्याला कधीच सीमा नसते आणि ओंजळ भरली तरी ओसंडून देणे एवढंच त्यांना माहित असतं त्यासाठी स्वत:साठी नव्हे तर इतरांसाठी जगणाऱ्या आणि झगडणाऱ्या नेतृत्वाची खरी गरज आज समाजाला वाटू लागली आहे. डॉ. अतुल बाबांच्या अनेक संस्था उभ्या करत असताना त्यातून ज्ञान, स्वकर्तुत्व व स्वावलंबीपणा निर्माण व्हावा, शिक्षणाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी असावा ही विचारसरणी बाबांच्या आचार विचार आणि वृत्तीतून दिसून येते. आश्वासनापेक्षा कृतीवर भर देवून अहोरात्र झगडणारे बाबा आज सर्वसामान्य लोकांच्या हृदयातील आढळस्थान बनले आहेत.

राजकारणात हार जित होत राहते परंतू समाजकार्यात स्वत:ला समर्पित केलेल्या डॉ. अतुल बाबांसारख्या धडाडीच्या नेतृत्वाला त्याची कधी पर्वा वाटली नाही. दुख: पचविण्याचे व यश मिळविण्याचे सामर्थ्य जन्मजातच ज्या रक्तांन भिनलेलं असतं. त्यांच्या वाटेत टाकलेले काटेही मोडून पडतात.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत देशाला समृद्ध करण्यासाठी मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या आहेत. ग्रामीण भागातील लोकांना स्वावलंबी तसेच आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी या योजना कराड शहराबरोबर, कराड दक्षिण मतदारसंघात अतुल भोसले बाबांच्या मार्गदर्शनाखाली राबवल्या आहेत. ग्रामीण भागाला शुद्ध पाणी, शिक्षण, आरोग्य सुविधा, वीज मिळण्यासाठी पाठपुरावा करून त्यांची त्वरीत अंमलबजावणी होत आहे.

अतुल भोसले (बाबा) यांच्या पाठीशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील ठाम राहिल्याने एका नव्या राजकीय पर्वाला सुरूवात झाली आहे. अशा या उद्योन्मूख नेतृत्वास वाढदिवसानिमित्त लक्ष लक्ष शुभेच्छा...!

**-एम.के.कापूरकर**
**अध्यक्ष-कराड तालुका साखर कामगार संघ रेठरे बु।।**

# बँकांनी सामाजिक जबाबदारी समजुन काम करावे:जिल्हाधिकारी



**सातारा/प्रतिनिधी**

बँकांनी सामाजिक जबाबदारी समजुन केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचे सर्वसामान्य व्यक्तींना लाभ मिळवून देण्यासाठी काम करावे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी केले.

जिल्हा अग्रणी बँकेच्या बँकर्स समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी रिझर्व बँक ऑफ इंडियाचे नरेंद्र कोकरे, बँक ऑफ महाराष्ट्रचे उपअचंल प्रबंधक श्रीकृष्ण झेले, नाबार्डचे महाप्रबंधक राजेंद्र चौधरी, अग्रणी बँक व्यवस्थापक युवराज पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंचल पाटील, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी विजयकुमार राऊत, जिल्हा उद्योग केंद्रचे महाव्यवस्थापक उमेश दंडगवाळ उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, अग्रणी बँकेने चालु वर्षासाठी ८ हजार ७५० कोटींचा पतपुरवठा प्राथमिक क्षेत्रासाठी तयार केला असून त्यापैकी राष्ट्रीयकृत, सहकारी तसेच खाजगी बँकांद्वारे ६ हजार ६८४ कोटी रुपयांचा कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. सर्व बँकांनी या वर्षात १०० टक्के उद्दिष्ठ पुर्तीसाठी प्रयत्न करावेत अशा सुचना जिल्हाधिकारी यांनी केल्या.

अग्रणी बँक व्यवस्थापक युवराज पाटील यांनी सन २०२३-२४ च्या पत आराखड्याविषयी माहिती देतांना सांगितले, प्रथामिक क्षेत्रासाठी ९ हजार ४०० कोटी रुपये पैकी कृषि क्षेत्राकरित ५ हजार कोटी, उद्योग व्यवसायाकरिता १ हजार ८५५ कोटी व इतर प्राथमिक क्षेत्रासाठी २ हजार ५४५ कोटी रुपये इतक्या कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत उद्दिष्टामध्ये ६५० कोटींची वाढ करण्यात आली आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे नरेंद्र कोकरे यांनी बँकेच्या ठेवी व कर्जाबाबत आढावा घेतला. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्रीमती पाटील यांनी नवीन राष्ट्रीय ग्रामीण जीवन उन्नती अभियानाबद्दल माहिती देऊन सर्व बँकांनी योजने अंतर्गत यावर्षी बचत गटांचे उद्दिष्ट साध्य करण्याविषयी सूचना दिल्या. जिल्हा उद्योग केंद्रचे महाव्यवस्थापक उमेश दंडगवाळ यांनी उचएत्रझ व झचएत्रझ या दोन्ही योजनांचा आढावा घेऊन उद्दिष्ट साध्य करण्याविषयी सूचना दिल्या.

यावेळी जिल्हा उद्योग केंद्र व विविध शासकीय विभागांचे व महामंडळांचे अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी तसेच सर्व बँकांचे अधिकारी उपस्थित होते.

# माजी सैनिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयागराजचे पथक साताऱ्यात येणार

**सातारा/प्रतिनिधी**

रक्षा लेखा महानियंत्रक यांच्या मार्फत पी.सी.डी.ए (पेन्शन) प्रयागराज यांची पथक स्पर्शबाबत माहिती देण्यासाठी व अडी अडचणी सोडविण्यासाठी दि. २७ ते दि. २९ मार्च २०२३ या कालावधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सातारा येथे उपस्थित राहणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व निवृत्ती वेतन धारक माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# जयवंत शुगर्सच्या १२ व्या गळीत हंगामाची उत्साहात सांगता

## १२३ दिवसांत ६,३३,२०७ मेट्रीक टन ऊस गाळप; ७,०४,७०० क्विंटल साखरेचे उत्पादन

**कराड/प्रतिनिधी**

धावरवाडी (ता.कराड) येथील जयवंत शुगर्स लिमिटेडच्या १२ व्या गळीत हंगामाची उत्साहात सांगता झाली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात विनायक भोसले यांच्या हस्ते ऊसतोडणी वाहतूकदारांचा सत्कार करण्यात आला.

धावरवाडी येथील जयवंत शुगर्सने संस्थापक डॉ.सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाच्या एकूण १२३ दिवसांच्या गळीत हंगामात ६ लाख ३३ हजार २०७ मेट्रीक टन ऊस गाळप केले असून, ७ लाख ४ हजार ७०० क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. तर सरासरी साखर उतारा १२.४९ टक्के इतका राहिलेला आहे. हंगाम सांगता सोहळ्याच्या निमित्ताने



कारखाना कार्यस्थळावर आयोजित कार्यक्रमात सर्वाधिक ऊसवाहतूक करणाऱ्या तोडणी वाहतूकदारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये कृष्णा काशीद, नवनाथ आरसुळ, भाऊसाहेब काशीद, बजरंग धोत्रे, अशोक पवार, किशोर मुळक, संतोष ढाकणे, सुंदर पोळ, हनुमान भिंगले, बाबू शेंबडे या तोडणी वाहतूकदारांचा सत्कार करण्यात आला.

प्रारंभी कारखान्यातील मिल फिटर गजानन पाटील आणि सौ.स्वाती पाटील या दाम्पत्याच्या हस्ते सत्यनारायण पूजा करण्यात आली. कार्यक्रमाला जयवंत शुगर्सचे प्रेसिडेंट सी. एन. देशपांडे, सरव्यवस्थापक एन. एम. बंडगर, उपसरव्यवस्थापक (टेक्निकल) आर. आर. इजाते, चीफ इंजिनिअर एच. एम. नदाफ, चिफ केमिस्ट जी. व्ही. हराळे, सिव्हिल इंजिनिअर एस. एच. शेख, केन मॅनेजर नाथाजी कदम, मुख्य शेतकी अधिकारी आर. जे. पाटील, प्रशासकीय अधिकारी आर. टी. सिरसाट, ई.डी.पी. मॅनेजर ए. एल. काशीद, मनुष्यबळ विकास अधिकारी संजय भुसनर, पर्चेस ऑफिसर पी. एस. जाधव, मटेरियल मॅनेजर जी. एस. बाशिंगे, इन्स्ट्रुमेंट मॅनेजर ए. बी. खटके, डेप्युटी चीफ केमिस्ट बी. जी. चव्हाणके, डिस्टीलरी विभागप्रमुख व्ही. जी. म्हसवडे, सेफ्टी ऑफिसर एस. व्ही. शिंदे, सुरक्षा अधिकारी विठ्ठल भोसले, केनयार्ड सुपरवायझर एस. एम. सोमदे, ए. एम. गोरे यांच्यासह कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

---

## 'आनंदाचा शिधा'चे वितरण महिनाभर सुरु राहणार

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा संचाचे वितरण २२ मार्च २०२३ पासून पुढील एक महिनाभर सुरु राहणार आहे, असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा, अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शेतकरी शिधा पत्रिकाधारकांना गुढीपाडवा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी सणांनिमित्त नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त प्रत्येकी १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर खाद्यतेल या ४ शिधा जिन्नसांचा समावेश असलेला आनंदाचा शिधा संच उपलब्ध करुन देण्याचा निर्णय २२ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार काही जिल्ह्यांत वितरण सुरू झाले आहे.

यापूर्वी सन २०२२ मधील दिवाळी सणानिमित्त माहे ऑक्टोबर २०२२ ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा संचाचे वितरण करण्यात आले होते, असे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

---

## सह्याद्रि हॉस्पिटलमध्ये ४८ वर्षीय डॉक्टरवर एकाच वेळी तीन शस्त्रक्रिया

**कराड/प्रतिनिधी**

सह्याद्रि हॉस्पिटल डेक्कन, पुणे येथील मल्टीडिसिप्लिनरी टीमने तीन शस्त्रक्रिया एकाच दिवशी यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. यामध्ये एकदाच भूल देऊन एऑर्टिक वॉल्व्ह रिप्लेसमेंट (एव्हीआर),बायपास शस्त्रक्रिया (सीएबीजी) त्यानंतर जीवंत दात्याद्वारे यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. दीर्घकालीन यकृताचा आजार, यकृताचा कर्करोग आणि हृदयाच्या रक्तवाहिन्यांचा विकारांसह अनेक गुंतागुंती असलेल्या ४८ वर्षीय पुरुष रुग्णावर या प्रक्रिया करण्यात आल्या. अशा प्रकारे या तिन्ही प्रक्रिया एकाच वेळी करण्यात आल्याची नोंद कोणत्याही अहवालात उपलब्ध नाही.

सह्याद्रि हॉस्पिटलच्या अवयव प्रत्यारोपण व हेपॅटोबिलिअरी शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख डॉ.बिपिन विभूते, हृदयरोग तज्ञ डॉ.सुहास हरदास, भूलतज्ञ मनीष पाठक, कराड येथील गॅस्ट्रोएंटेरॉलॉजिस्ट डॉ.संदीप पाटील, कार्डिओथोरॅसिक सर्जन डॉ.संदीप तडस, शल्य चिकित्सक डॉ.अभिजित माने, सह्याद्रि हॉस्पिटल कराडचे संचालक दिलीपभाऊ चव्हाण, युनिट हेड डॉ.वेंकटेश मुळे आदी मान्यवर पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

सह्याद्रि हॉस्पिटल कराड येथील गॅस्ट्रोएंटेरॉलॉजिस्ट डॉ.संदीप पाटील यांचा या रुग्णाने सल्ला घेतला होता. त्यावेळेस त्यांना यकृताचा गंभीर आजार असल्याचे निदान झाले होते.त्यानंतर डॉ. पाटील यांनी त्यांना डॉ.बिपीन विभुते यांच्याकडे पाठवले.

याबाबत सांगताना सह्याद्रि हॉस्पिटलमधील




अवयव प्रत्यारोपण व हेपॅटोबिलिअरी शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख डॉ.बिपिन विभूते म्हणाले की,आमच्याकडे. ऑक्टोबर २०२२ मध्ये एक ४८ वर्षीय व्यक्ती अनेक गुंतागुंतीसह उपचाराकरिता आले.त्यांना एचसीव्ही संसर्गामुळे झालेला दीर्घकालीन यकृताचा आजार होता.त्याबरोबर पोटातील दाब वाढल्यामुळे जलोदर द्रव पदार्थांची गळती आणि त्यामुळे रक्तवाहिन्या फुगून व फुटून झालेला रक्तस्त्राव (जीआय ब्लीड) ही गंभीर स्थिती होती.पेट स्कॅन द्वारे त्यांना यकृताचा कर्करोग असल्याचे निदान झाले आणि याबाबतीत यकृत प्रत्यारोपण हाच एक पर्याय उरला होता.

प्रत्यारोपणासाठी ते शारीरिकरित्या पात्र आहेत की नाही याची चाचपणी करत असताना त्यांना हृदयाच्या धमनीचा आणि झडपेचा विकार (एओर्टिक वॉल्व्ह स्टेनॉसिस) असल्याचे निदान झाले. यामुळे प्रत्यारोपण तर सोडूनच द्या कुठलीही शस्त्रक्रिया करणे अत्यंत जोखीमकारक होते.

सह्याद्रि हॉस्पिटलमधील हृदयरोग तज्ञ डॉ.सुहास हरदास यांच्या मते या रुग्णाला महाधमनीच्या झडपेचा जन्मजात विकार (कॉंजिनेंटल स्टेनोसिस ऑफ एऑर्टिक वॉल्व्ह) होता.त्यामुळे प्रत्यारोपण करण्याआधी हृदयाशी निगडीत समस्यांचे निदान करणे गरजेचे होते,कारण हे प्रत्यारोपणादरम्यान जोखीमकारक ठरू शकले असते. या परिस्थितीमध्ये प्रत्यारोपणाआधी झडप बदलणे गरजेचे होते.

सह्याद्रि हॉस्पिटल येथील कार्डिओथोरॅसिक सर्जन डॉ.संदीप तडस म्हणाले की,रुग्णाला महाधमनीचा विकार होता आणि अँजिओग्राफीचा सल्ला दिला गेला.उजव्या रक्तवाहिनीमध्ये ७५ टक्के अडथळा (ब्लॉकेज) होता.

डॉ.विभुते म्हणाले की,एऑर्टिक वॉल्व्ह रिप्लेसमेंट आणि बायपास शस्त्रक्रिया पहिले करून मग ६ ते १२ आठवड्यानंतर प्रत्यारोपण करणे हा एक पर्याय होता.मात्र यात जोखीम होती.पण यापेक्षा जास्त जोखीम ही यकृत प्रत्यारोपणासाठी थांबणे किंवा विलंब करणे ही होती,कारण तोपर्यंत यकृतातील ट्युमरचा आकार वाढला असता आणि शस्त्रक्रिया करणे शक्य झाले नसते.त्यामुळे आम्ही विविध विभागांबरोबर बैठक घेतली आणि एक वेगळा दृष्टीकोन मांडला.एकाच वेळी तीन शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.एकदाच भूल देऊन एऑटिक वॉल्व्ह रिप्लेसमेंट, बायपास शस्त्रक्रिया,जिवंत दात्याकडून यकृत प्रत्यारोपण करण्याचे ठरविले.

डॉ.विभूते म्हणाले की,एकाच वेळेस अनेक प्रक्रिया करणे हे अत्यंत जोखमीचे व आव्हानात्मक असते.त्यासाठी अनुभवी डॉक्टरांची बहुआयामी टीम,अत्याधुनिक सोयी-सुविधा महत्त्वाच्या असतात.जी गोष्ट अशक्य वाटत होती ती बहुआयामी दृष्टीकोन,रुग्णाच्या शारीरिक परिस्थितीचा अचूक आढावा,अशा प्रक्रिया पार पाडण्याची टीमच्या क्षमतेची समज,उपलब्ध सोयी आणि योग्य नियोजन या सर्व गोष्टींद्वारे शक्य झाले.

सह्याद्रि हॉस्पिटल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त संचालक अबरार अली दलाल म्हणाले की,आमच्या या टीमची कामगिरी प्रशंसनीय आहे,कारण यामुळे अशा गुंतागुंतीच्या स्थितीत असलेल्या रुग्णांना एक नवी आशा निर्माण होते.याचबरोबर आपल्या पतीला यकृत दान करणार्‍या त्यांच्या पत्नीला सलाम.जेणे करून त्यांना एक नवजीवन प्राप्त झाले.

पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांपर्यंत पोहचून त्यांना उपचार सहजरित्या उपलब्ध व्हावेत या दृष्टीने सातारा , कराड, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी , चिपळूण येथे सह्याद्रि हॉस्पिटल्स तर्फे लिव्हर ओपीडी नियमितपणे चालवल्या जातात . त्याशिवाय कराड आणि कोल्हापूर येथे लहान मुलांमधील यकृत आजारांसंदर्भात ओपीडी सुरु आहेत.

---

# लवकरच 'या' रस्त्यांची काम होऊन नागरिकांच्या समस्या सुटणार:रामकृष्ण वेताळ

**कराड/प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष कराड तालुक्यातील शिवडे, भगतवाडी व कामथी या गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचा प्रश्न अनुत्तरीत होता. या प्रश्नासाठी राज्य शासनाच्या पातळीवर पाठपुरावा करून तीनही गावांना जोडणाऱ्या रस्त्यांसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सुमारे १३ कोटींचा निधी मंजूर केला. यामुळे लवकरच या रस्त्याचे काम होऊन नागरिकांची समस्या सुटणार आहेत. आज या गावातील ग्रामस्थांनी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव रामकृष्ण वेताळ यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे आभार मानले.

कराड उत्तरमधील सुर्ली पाटी, कामथी, बोंबाळवाडी हद्दीपर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे, शिवडे ते भवानवाडी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे आणि मरळी ते भगतवाडी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या तीनही रस्त्यांच्या कामासाठी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने सुमारे १३ कोटी रुपयांचा भरघोस निधी प्राप्त झाला आहे. हा निधी प्राप्त



करून घेण्यासाठी या ग्रामस्थांनी रामकृष्ण वेताळ यांच्याकडे विनंती केली होती. या विनंतीनुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता करून रामकृष्ण वेताळ यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर हा विषय मांडला. रस्ता होणे किती आवश्यक आहे हेही त्यांना पटवून दिले. त्यामुळे त्यांनी या रस्त्यांसाठी भरघोस असा सुमारे १३ कोटींचा निधी मंजूर करून दिला आहे. भविष्यात या गावांना जोडणारा पक्का आणि दर्जेदार रस्ता या निधीतून पूर्ण होणार आहे.

रस्त्याच्या समस्येमुळे या लोकांना दैनंदिन व्यवहार करताना अनेक अडचणी येत होत्या. मरळी-भगतवाडी हा रस्ता स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे होऊ शकला नाही. या गावातील लोक रस्त्या अभावी पायी चालत इतर गावांना जात होते. इतक्या वर्षांनी हा रस्ता मंजूर झाल्याने त्यांची समस्या कायमची सुटली आहे. शेतकऱ्यांनाही आपला शेतमाल बाजारापर्यंत पोहोचवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. गेली अनेक वर्ष हा प्रश्न अधांतरी लटकून राहिला होता. या प्रश्नाकडे कोणाचेही लक्ष नव्हते. त्यामुळेच या गावातील लोकांनी रामकृष्ण वेताळ यांना हा प्रश्न सोडवण्याची विनंती केली होती. वेताळ यांनी तात्काळ यामध्ये लक्ष घालून हा प्रश्न सोडवल्याने आनंदी झालेल्या शिवडे, भगतवाडी, कामथी, भवानवाडी, पाली, मरळी, सुर्ली ग्रामस्थांनी आज त्यांचे आभार व्यक्त केले. त्याचबरोबर शाल, श्रीफळ, पेढे देऊन आपला आनंद व्यक्त केला.यावेळी सुरेश पाटील, शंकरराव शेजवळ, सुर्यकांत पडवळ, प्रशांत भोसले, मनोहर साळुंखे, जगन्नाथ साळूंखे, डॉ. शहाजी खंडागळे, निवास खंडागळे, नामदेव खंडागळे, दिनेश घाडगे, आशुतोष माळी, सुधीर दिक्षीत, निखिल घाडगे, प्रदिप कांबळे, भवानवाडी माजी सरपंच संतोष पवार, शिवाजी भोसले, संतोष वेताळ, शंकर पाटील, राजेंद्र पाटील, कृष्णत वेताळ, मच्छिंद्र वेताळ यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जास्तीत जास्त निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्नशील राहणार

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, जिल्हाध्यक्ष जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना आणि कामासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून घेण्यासाठी यापुढील काळात प्रयत्नशील राहणार आहे. प्रदेश सचिव विक्रम पावसकर. कार्यकारणी सदस्य भरत पाटील, वर्धन अॅग्रोचे धैर्यशील कदम, माण खटाव अॅग्रोचे मनोज घोरपडे यांच्या सहकार्याने लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम तत्पर राहणार आह

**-रामकृष्ण वेताळ**
**सचिव,भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेश**



मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)



स्व.जयवंतराव भोसले (आप्पा)



मा.डॉ.सुरेश भोसले (बाबा)

भारतीय जनता पार्टीचे सातारा लोकसभा प्रभारी, कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन, युवा नेते

**मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!



मा.धोंडीराम जाधव (दादा)

## मा.धोंडीराम जाधव (दादा)

संचालक,य.मो.कृष्णा सह.साखर कारखाना, रेठरे बु।।

---

भारतीय जनता पार्टीचे सातारा लोकसभा प्रभारी, कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन, युवा नेते


**मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा...!

## मा.श्री.चंद्रकांत देसाई

**कराड-मलकापूर**



मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)

---

भारतीय जनता पार्टीचे सातारा लोकसभा प्रभारी, कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन, युवा नेते

**मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक

शुभेच्छा



मा. डॉ. अतुल भोसले (बाबा)

*मा.महादेव कापूरकर(अध्यक्ष), *मा.एस.के.शिंदे(उपाध्यक्ष), *मा.सर्जेराव पाटील (जनरल सेक्रेटरी), *मा.मोहन शेटे (खजिनदार), *मा.हौसेराव लोकरे(जॉइंट सेक्रेटरी)

**सर्व पदाधिकारी व सभासद**


## कराड तालुका साखर कामगार संघ, रेठरे बु।।

*मा.बाळासाहेब पाटील (अध्यक्ष), *मा.भिमराव पाटील (उपाध्यक्ष) *मा.जितेंद्र साळुंखे(सेक्रेटरी) *मा.रामचंद्र पाटील (कार्याध्यक्ष), *मा.प्रशांत चव्हाण(खजिनदार)


**सर्व पदाधिकारी व सभासद**

## श्री गणेश शिवोत्सव मंडळ, शिवनगर


---



मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)



स्व.जयवंतराव भोसले (आप्पा)



मा.डॉ.सुरेश भोसले (बाबा)

भारतीय जनता पार्टीचे सातारा लोकसभा प्रभारी, कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन, युवा नेते

**मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

ठेव विश्वासाची सर्वोत्तम परताव्याची!

-:आकर्षक ठेव योजना:-

- सेव्हिंग्ज ठेव : ४ %
- १५ दिवस ते ९० दिवस : ५.५ %
- ९१ दिवस ते १८० दिवस : ६.५ %
- १८१ दिवस ते ३६५ दिवस : ७.५ %
- १ वर्ष १ दिवस ते ३ वर्षापर्यंत: ९ %
- मासिक व्याज प्राप्ती ठेव : ८.५ %
- दामदिडपट ठेव : ५ वर्षे १ महिने
- दामदुप्पट ठेव : ८ वर्षे ७ महिने
- रिकरिंग ठेव योजना (१ वर्ष ते पुढे ३ वर्षापर्यंत): ८%
- ♦ NEFT/RTGS/IMPS/SMS Alert सेवा.
- ♦ विनम्र व तत्पर सेवा.
- ♦ कोअर बँकिंग प्रणाली नुसार व्यवहार

**चेअरमन, व्हाईस चेअरमन,सर्व संचालक, सभासद व सेवक वर्ग**

## सहकार महर्षी मा.जयवंतराव भोसले (आप्पा) नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड

प्रधान कार्यालय:श्री.रोहिणी रेसिडेन्सी, विठ्ठल रूक्मिणी मंदिराशेजारी, कोयनावसाहत, मलकापूर, कराड फोन (०२१६४) २४३३३१/२२९४३३

**६०० कोटी व्यवसायाकडे वाटचाल**

---

भारतीय जनता पार्टीचे सातारा लोकसभा प्रभारी, कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन, युवा नेते

**मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा...



मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)

सौ.सुवर्णा कापुरकर
सरपंच

श्री.शिवाजीराव चव्हाण
उपसरपंच

श्री.संतोष इंगवले
ग्रामविकास अधिकारी

**सर्व सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ**

## ग्रामपंचायत रेठरे बुद्रुक

ता.कराड जि.सातारा

---



भारतीय जनता पार्टीचे सातारा लोकसभा प्रभारी, कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन, युवा नेते

**मा.डॉ.अतुल भोसले (बाबा)**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा...

## मा.संजय पवार (संस्थापक अध्यक्ष)

- कै.गणपतराव स.पवार नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,रेठरे बु।।
- मा.जयवंतराव भोसले सहकारी दुध उत्पादक प्रक्रिया संस्था लि.रेठरे बु।।
- मा.जयवंतराव भोसले सार्वजनिक ग्रंथालय, रेठरे बु।।
- कृष्णाकाठ स्वयंरोजगार उद्योग व सेवा सहकारी सोसायटी लि.,रेठरे बु।।

सर्व संस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक, सभासद व कर्मचारी वर्ग

आयुष्यमान हे साप्ताहिक मुद्रक प्रकाशक व मालक अतुल सुभाष होनकळसे यांनी श्री भगवानकृपा प्रिंटींग प्रेस, शेतकरी मशिनरी मागे, शास्त्रीनगर मलकापूर ता.कराड जि.सातारा महाराष्ट्र ४१५५३९ येथे छापून, २०७ शनिवार पेठ, शाहु चौक कराड ता.कराड जि.सातारा महाराष्ट्र ४१५ ११० येथुन प्रकाशित केले. *संपादक-अतुल सुभाष होनकळसे *RNI No- MAHMAR/2009/32171 (या अंकात छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशकसहमत असतीलच असे नाही. वाद विवाद कराड न्यायालयीन कक्षेत.)
Email-aayushman11@gmail.com Cell No.-09850571320